विकास व कल्याण

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ,मुंबई.**
**एम.एम.टी.सी. हाऊस, पाचवा मजला, प्लॉट नं. सी २२,**
**ब्लॉक - ई , वांद्रे- कुर्ला संकुल,**
**वांद्रे (पूर्व),मुंबई ४०० ०५१ .**

**मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री, (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ६१ व्या बैठकीचे इतिवृत्तांत**

*******

---

**बैठक स्थळ :- मा. मंत्री, (कामगार) तथा मा.अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचे निवासस्थान ज्ञानेश्वरी बंगला, मलबार हिल, मुंबई**
**दिनांक. :- ०९.१०.२०२४ (बुधवार)**
**वेळ :- सकाळी ११.००**

---

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ६० वी बैठक दि.०२.०७.२०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती. मंडळाची ६१ वी बैठक बुधवार दि.०९.१०.२०२४ रोजी सकाळी ११.०० आयोजित करण्यात आली आहे. सदर बैठकीची विषय सूची खालीलप्रमाणे :-


| अ.क्र. | बैठकीचा विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ०१. | केंद्र शासनाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत विविध कल्याणकारी योजनांचे सामाजिक अंकेक्षण (Social Audit) करणेकरीता मे. इन्स्टालॉजिक सोल्यूशन्स प्रा. लि. संस्थेची नियुक्ती करणेबाबत. | ५ ते ७ |
| ०२. | मंडळाअंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना ६,००,००० संच (अत्यावश्यक संच व सुरक्षा संच प्रत्येकी) वाटपाबाबतच्या लक्ष्यांक वाढीस अंतिम मान्यता प्रदान करून योजना बंद करणेबाबत. | ८ ते ९ |
| ०३. | मंडळाअंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना ९,००,००० गृहपयोगी वस्तू संच वाटपाबाबतच्या लक्ष्यांक वाढीस मान्यता प्रदान करणेबाबत. | १० ते ११ |
| ०४. | मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगार व कुटुंबिय यांचेकरीता राबविण्यात येणाऱ्या तपासणी ते उपचार (Test to Treat) आरोग्य योजनेमध्ये बांधकाम कामगाराच्या आई -वडीलांचा समावेश करणेबाबत. | १२ ते १३ |
| ०५. | सन २०२०-२१ आणि सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयांमधील मंडळ कामकाजासाठी मे. ब्रिक्स इंडिया प्रा. लि या बाहयस्त्रोत यंत्रणेकडून मंडळाचे पुर्वमंजुरीस अधीन राहुन घेण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचारी सेवा व त्यांना अदा केलेल्या मानधन कार्यवाहीस मजुंरी देणेबाबत | १४ ते १६ |
| ०६. | मंडळाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची प्रचार प्रसिध्दी बाबतचा सन-२०२४-२०२५ च्या आराखडा सुधारीत करणेबाबत. | १७ ते २० |
| ०७. | मंडळाच्या विविध योजनांच्या प्रचार प्रसिध्दीसाठी अतिरिक्त सर्वसमावेशक माहिती पुस्तिकांची छपाई करणेबाबत. | २१ ते २२ |
| ०८. | मंडळाअंतर्गत मुख्यालय व अधिनस्त जिल्हा कार्यालयाच्या अभिलेख | २३ ते २४ |

| अ.क्र. | बैठकीचा विषय | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| | कक्षाकरीता अतिरिक्त कॉम्पॅक्टर स्टोरेज उपलब्ध करून देणेबाबत व ३ वर्षाकरीता मान्य दरानुसार कागदपत्रांचे स्कॅनिग करण्यास मान्यता देणेबाबत. | |
| ०९. | मंडळाकडे प्राप्त अतिरिक्त उपकर परतावा प्रकरणांना मान्यता देणेबाबत. | २५ ते २६ |
| १०. | बांधकाम कामगारांच्या सुविधेकरीता अतिरिक्त तालुका सुविधा केंद्र स्थापन करण्याबाबत. | २७ ते २८ |
| ११. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील सन २०२४-२५ मधील गुंतवणूक उपसमितीने अतिरिक्त निधीच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये केलेल्या गुंतवणुक कार्यवाहीस मंजुरी देणे. | २९ ते ३१ |
| १२. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील सन २०२४-२५ या चालु आर्थिक वर्षातील माहे एप्रिल ते सप्टेंबर - २०२४ अखेर उपकर जमा व योजनानिहाय खर्चास मंजुरी देणे. | ३२ ते ३३ |
| १३. | NSDC इंटरनॅशनल आणि महाराष्ट्र इंटरनॅशनलव्दारे इस्त्राईलमध्ये १०००० बांधकाम कामगारांसाठी बांधकाम क्षेत्रामध्ये रोजगाराच्या उपलब्ध संधी बाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत. | ३४ ते ३६ |
| १४. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील आर्थिक प्रदानांचे करीता मुदत ठेवीवर ओव्हरड्राफ्ट घेणेच्या कार्यवाहीस मंजुरीबाबत. | ३७ ते ४० |
| १५. | मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयामध्ये कार्यरत बाह्यस्त्रोत यंत्रणेव्दारे कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन शासन मान्यतेच्या अधिन राहून माहे मार्च, २०२५ पर्यंत अदा करण्यास मंडळाची मान्यता प्रदान करण्याबाबत. | ४१ ते ४२ |
| १६. | मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने आयत्या वेळेचे विषय | ४३ |

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या**
**दिनांक ०९.१०.२०२४ रोजी संपन्न झालेल्या ६१ व्या बैठकीचे इतिवृत्त.**

मा. ना. श्री. सुरेश (भाऊ) दगडू खाडे, मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ६१ वी बैठक बुधवार दिनांक ९.१०.२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. मा. मंत्री, (कामगार) तथा मा. अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचे निवासस्थान ज्ञानेश्वरी बंगला, मलबार हिल, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य बैठकीस उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नाव | पद |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. सुरेश (भाऊ) खाडे | मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |
| २. | मा. श्रीम. विनिता वेद सिंगल, प्रधान सचिव, कामगार | शासकीय प्रतिनिधी |
| ३. | मा. डॉ. एच. पी. तुम्मोड, कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | मा. श्री. दिपक पोकळे, उप सचिव काम-७ | शासकीय प्रतिनिधी |
| ५. | मा. श्री. विवेक शंकर कुंभार | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, मा. प्रधान सचिव, कामगार विभाग मा. कामगार आयुक्त, मंडळ सदस्य या उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीत करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संचाच्या प्रती सर्व उपस्थित सदस्यांना वाटप करण्यात आली.

तद्नंतर विषयसुचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

**विषय क्र.०१ :- केंद्र शासनाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचे सामाजिक अंकेक्षण (Social Audit) करणेच्या कार्यवाहीस मान्यतेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा. सर्वोच्च न्यायालयाने याचिका क्र. सिव्हील नं.३१८/२००६ च्या संदर्भात दि. १९.०३.२०१८ रोजीच्या आदेशातील परिच्छेद क्र.७५ मध्ये "It would be worthwhile and relevant for the state Government and Welfare Board and in every state and union territory administration to conduct a Social Audit" असे निर्देश दिले आहेत. तसेच श्रम व रोजगार मंत्रालय भारत सरकार यांच्या दि. २७.०८.२०१९ च्या पत्रानुसारही अशा प्रकारचे निर्देश प्राप्त झाल्याने मंडळ ठराव क्र.५७(१६) २०२१ अन्वये मंडळातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांतर्गत लाभ वाटपाचे सामाजिक अंकेक्षण यशदा किंवा टाटा इंस्टीट्यूट ऑफ सोशल सायन्स या दोन्ही संस्थांकडून सोशल ऑडीट बाबत वेळोवेळी पाठपुरवठा करूनही मंडळास कोणताही प्रतिसाद प्राप्त झालेले नाही.

२. सबब, शासन निर्णय नियोजन विभाग (रोहयो) दि.०४.१२.२०१७ अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सामाजिक अंकेक्षण प्रक्रिया राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शक सोसायटी मुंबई यांच्याशी मंडळ पत्र दि.२०.०१.२०२२ अन्वये मंडळ योजनांचे सामाजिक अंकेक्षण करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार सोसायटीने मंडळाच्या अंकेक्षण करण्याच्या प्रस्तावावर निर्णय घेण्यासाठी काही मुद्दयांवर मागविलेली माहिती मंडळाकडून सोसायटी यांना पाठविण्यात आली.

३. मंडळ पत्र दि.१०.०१.२०२४ अन्वये मंडळ योजनांचे सामाजिक अंकेक्षण करण्यासाठी शासनास पाठविलेल्या प्रस्तावास उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांचे दि.२४.०१.२०२४ पत्रान्वये नियोजन विभागाअंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण तथा परदर्शक सोसायटीमार्फत मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचे सामाजिक अंकेक्षण करण्यास आणि ज्या जिल्ह्यात सर्वात जास्त बांधकाम कामगार लाभार्थी आहेत, आशा विभागनिहाय प्रत्येकी दोन जिल्ह्यांची निवड मंडळाने करावी. मंडळाच्या बांधकाम कामगारांसाठीच्या कल्याणकारी योजनांपैकी ज्या दहा

योजनांचा लाभ जास्तीत जास्त कामगारांना देण्यात आला आहे अशा योजनांचे सन २०२०-२१, २०२१-२२ आणि २०२२-२३ या तीन आर्थिक वर्षांचे सामाजिक अंकेक्षण करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली. व तसे सोसायटीस कळविण्यात आले.

४. सोसायटीचे दि.२२.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये मंडळाकडे सन २०२०-२१,२०२१-२२ आणि २०२२-२३ या वर्षातील सर्वाधिक लाभार्थी असलेल्या सामाजिक अंकेक्षण करावयाच्या एकूण १२ जिल्ह्यांची यादी तसेच सदर पत्रातील नमूद १२ जिल्ह्यांतील १० योजनांवर मागील तीन वर्षात झालेल्या खर्चाच्या ०.५% निधी सोसायटीस वितरीत करण्याची मागणी करण्यात आली. त्याचप्रमाणे प्राप्त पत्रातील प्रपत्रान्वये (Annexure-I) मागणी केलेली २६ मुद्दयांची माहिती सोसायटीस सादर करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली होती. दरम्यान, महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी यांचे दि. २०.०६.२०२४ चे पत्रान्वये मंडळाकडून प्रलंबित माहिती व ०.५% निधी मागणी करण्यात आली सदर नस्ती मा. अध्यक्ष मंडळ यांचेकडे सादर करण्यात आली.

५. दरम्यान, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचे सामाजिक अंकेक्षण करण्याकरीता मे.इन्स्टालॉजिक सोल्यूशन्स प्रा.लि. या संस्थेमार्फत उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांचे दि.०५.०७.२०२४ रोजीच्या प्राप्त पत्रान्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

६. सदर प्राप्त पत्राच्या अनुषंगाने, मंडळ पत्र दि.१३.०८.२०२४ अन्वये मे.इन्स्टालॉजिक सोल्यूशन्स प्रा.लि ही मंडळाच्या उपकर प्रणाली विकसित करण्यासाठी ई-निविदेद्वारे निवड केलेली संस्था असून ती मंडळाच्या संपूर्ण उपकर प्रणालीचे व्यवस्थापन पाहणार असल्याने तसेच मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा खर्च उपकरातून करण्यात येत असल्याने योजनांचे विश्लेषण हा सामाजिक अंकेक्षणाचा भाग आहे त्यामुळे संबंधित संस्थेच्या कार्यादेशातील व्याप्तीमध्ये उपकर प्रणाली विकसित करण्यासोबत मंडळाच्या योजनांचे अंकेक्षण करण्याचेही अंतर्भूत करून कामकाजाची व्याप्ती वाढविण्याबाबत (An extension to the existing work order of cess portal) मे. इन्स्टालॉजिक सोल्यूशन्स प्रा.लि. यांचे मार्फत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मंडळांच्या योजनांचे व उपकर संकलनाचे सामाजिक अंकेक्षण करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांचे दि.२८.०८.२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी या संस्थेची

नियुक्ती रद्द करून त्याऐवजी मे. इन्स्टालॉजिक सोल्यूशन्स प्रा.लि. या संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे.

७. मे.इन्स्टालॉजिक सोल्यूशन्स प्रा.लि यांनी शासनास सादर केलेल्या प्रस्तावामध्ये सामाजिक अंकेक्षणासाठी येणाऱ्या खर्चाचे/ दराचे कोणतेही अंदाजपत्रक सादर केले नसल्याने महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी यांनी सदर कामासाठी मागणी केलेल्या १२ जिल्ह्यांतील १० योजनांवर मागील तीन वर्षांत झालेल्या खर्चाच्या ०.५% या दराने मे.इन्स्टालॉजिक सोल्यूशन्स प्रा.लि. या संस्थेस देयक अदायगी करणे प्रस्तावित आहे.

८. मे.इन्स्टालॉजिक सोल्यूशन्स प्रा.लि. या संस्थेने मंडळास राष्ट्रीयकृत बँकेच्या परफॉर्मन्स बँक गॅरंटी स्वरूपात सुरक्षा अनामत रक्कम जमा केली आहे, त्यानुसार करारनामा व कार्यारंभ आदेश देण्याची कार्यवाही सुरू आहे.

**ठराव क्र.६१(१)/२०२४ :-**

**१. मंडळाच्या बांधकाम कामगारांसाठीच्या कल्याणकारी योजनांपैकी ज्या दहा योजनांचा लाभ जास्तीत जास्त कामगारांना देण्यात आला आहे अशा योजनांचे सन २०२०-२१, २०२१-२२ आणि २०२२-२३ या तीन आर्थिक वर्षाचे सामाजिक अंकेक्षण मे. इन्स्टालॉजिक सोल्यूशन्स प्रा.लि. या संस्थेमार्फत करण्यास व त्यापोटी १२ जिल्हयातील १० योजनांवर मागील तीन वर्षात झालेल्या खर्चाच्या ०.५% या दराने रक्कम अदा करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**२. मे. इन्स्टालॉजिक सोल्यूशन्स प्रा.लि. यांच्या सोबत करारनामा करणे व नियुक्त संस्थेस कार्यारंभ आदेश देण्याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०२ :- मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना ६,००,००० संच (अत्यावश्यक संच व सुरक्षा संच प्रत्येकी) वाटपाबाबत लक्ष्यांक वाढीस अंतिम मान्यता प्रदान करून योजना बंद करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना कामाच्या ठिकाणी सुरक्षितता प्रदान करण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या वस्तूंचा सुरक्षा संच आणि अत्यावश्यक संच मोफत वाटप करण्याची योजना कार्यन्वित आहे. सदर योजनेच्या उपयुक्ततेमुळे विविध लोकप्रतिनिधी आणि संघटनांकडून झालेल्या मागणीच्या अनुषंगाने वेळोवेळी मुदत व लक्ष्यांकवाढ देण्यात आली आहे.

दि. १५.०३.२०२४ रोजी देण्यात आलेल्या मुदतवाढ कार्यारंभ आदेशाच्या अनुषंगाने सुरक्षा संच व अत्यावश्यक संच प्रत्येकी ३,९१,८५३ लक्ष दिनांक ३१.०८.२०२४ पर्यंत वाटप पुर्ण करण्याचे निर्धारित करण्यात आले होते. सदरचा लक्ष्यांक जवळपास पुर्ण झाला असून, माहे सप्टेंबर २०२४ मध्ये मा. लोकप्रतिनिधी यांनी सुरक्षा संच व अत्यावश्यक संच प्रत्येकी ४.५० लक्ष वाटपाची केलेली मागणी, १.०० लक्ष सुरक्षा व अत्यावश्यक संचाची अतिरीक्त मागणी आणि माहे ऑक्टोबर २०२४ मध्ये लोकप्रतिनिधीनी नोंदविलेली सुरक्षा संच व अत्यावश्यक संच प्रत्येकी १.५० लक्ष वाटपाच्या केलेल्या मागणीच्या अनुषंगाने मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यास शासनाने ४,५०,००० संच वाटपास दिनांक ०३.०९.२०२४ व १,५०,००० संच वाटपास दि.०१.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये संच वाटपाचे अंतिम नवीन लक्ष्यांक पुर्ण करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे व तद्नंतर योजना बंद करण्याचे निर्देशित करण्यात आले आहे व अत्यावश्यक संच व सुरक्षा संचाच्या लक्ष्यांकवाढीबाबत कोणताही प्रस्ताव शासनास सादर करण्यात येऊ नये. तसेच, सदर संच वाटपाच्या अंतिम लक्ष्यांक वाढीस मंडळाच्या आगामी बैठकीत कार्योत्तर मान्यता घेणेबाबतही निर्देशित केले आहे. त्या अनुषंगाने ४,५०,००० लक्ष सुरक्षा संच व अत्यावश्यक संच व १,५०,००० सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाकरीता नियुक्त संस्थेसोबत रीतसर करारानामा करून पुरवठा आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

**ठराव क्र.६१(२)/२०२४ :-**

**मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना वितरित करावयाच्या सुरक्षा संच व अत्यावश्यक संचाच्या एकूण ६,००,०००/- इतक्या लक्षांकवाढीस अंतिम मान्यता प्रदान करण्यात येत आहे व सदर योजना बंद करण्यासही मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याणकारी मंडळ,**
**मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र.०३ :- मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना ९,००,००० गृहपयोगी वस्तू संच वाटपाबाबतच्या लक्ष्यांक वाढीस मान्यता प्रदान करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना १७ प्रकारच्या ३० गृहपयोगी वस्तूंचा गृहपयोगी वस्तू संच मोफत वाटपाची योजना कार्यान्वित आहे. सदर योजनेंतर्गत सुरूवातीच्या १० लक्ष गृहपयोगी वस्तू संच वाटप लक्षांकाच्या पूर्ततेनंतर सदर योजनेच्या उपयुक्ततेमुळे विविध लोकप्रतिनिधी कडून केलेल्या मागणीनुसार ६,१३,५६१ वाढीव संच वाटपास प्राप्त शासन मान्यतेनुसार नोंदीत बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच वाटपाची कार्यवाही करण्यात आली. सदर वाढीव लक्ष्यांक जवळपास पूर्ण होत आला असून माहे ऑगस्ट २०२४ मध्ये अद्याप सदर योजनेचा लाभ मिळाला नसलेल्या बांधकाम कामगारांना योजनेचा लाभ मिळण्यासाठी लोकप्रतिनिधींनी केलेल्या ९.०० लक्ष वाढीव संच मागणीस मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने शासनास सादर केलेल्या प्रस्तावास प्राप्त शासन मान्यतेनुसार संबंधित पुरवठादारांशी गट क्र.०१ व गट क्र.०२ करीता करारनामा व कार्यारंभ आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर कार्यवाही मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आली होती.

नियुक्त संस्थेसोबत केलेल्या करारनाम्यातील अट क्र. (h) मध्ये अतिरिक्त गृहपयोगी वस्तू संच लक्ष्यांक वाढविणेबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

RFP clause 8.1 " We hereby undertake to supply, deliver and distribute the additional required quantities of the Household item kit, if any as and when directed by MBOCWW Board reserves the right to increase or decrease quantity of Household kit to be distributed, at same until cost per kit and no price escalation shall be permitted for contract period and agency shall have abide by the same

वरील अटीच्या अनुषंगाने बांधकाम कामगार नोंदणी व गृहपयोगी वस्तू संचाची मागणी पाहता सर्वसाधारणपणे ९,००,००० लक्ष अतिरिक्त गृहपयोगी वस्तू संच वितरणाचा प्रस्ताव मा. मंत्री महोदय (कामगार) तथा अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या मान्यतेने दि.२१.०८.२०२४ रोजी शासन मान्यतेस सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास शासनाने दि.०३.०९.२०२४ अन्वये मान्यता प्रदान केली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने नियुक्त संस्थेसोबत रीतसर करारनामा करून पुरवठा आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

**ठराव क्र.६१(३)/२०२४ :-**

**मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना वितरित करावयाच्या गृहपयोगी वस्तू संचाच्या एकूण ९,००,०००/- इतक्या लक्षांकवाढीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**<br>**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**<br>**कामगार कल्याणकारी मंडळ,**<br>**मुंबई** | **अध्यक्ष**<br>**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**<br>**कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र.४ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवित) बांधकाम कामगार व कुटुंबिय यांचेकरीता राबविण्यात येणाऱ्या तपासणी ते उपचार (Test to Treat) आरोग्य योजनेमध्ये बांधकाम कामगाराच्या आई-वडीलांचा समावेश करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, उद्योग, ऊर्जा कामगार व खनिकर्म विभाग शासन निर्णय दि.१२.०७.२०२४ अन्वये मंडळातील नोंदीत सक्रीय (जिवित) बांधकाम कामगार व त्यांचेवर अवलंबित यथास्थिती पती / पत्नी व त्यांची १० वर्षावरील २ अविवाहीत अपत्ये यांचेकरीता तपासणी ते उपचार आरोग्य योजना राबविण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. मंडळ व शासन स्तरावर विविध संघटनासोबत होणाऱ्या बैठकांमध्ये वारंवार विविध कामगार संघटनाकडून प्राप्त मागणीच्या अनुषंगाने " तपासणी ते उपचार आरोग्य योजनेत" लाभार्थी बांधकाम कामगारांच्या आई – वडीलांचा समावेश करणेबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

विविध कामगार संघटनांच्या मागणीनुसार दि.१२.०७.२०२४ च्या शासन निर्णयातील परिच्छेद -२ (अ) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा प्रस्तावित करण्यात आलेली होती.

**(अ-१)** सदर योजनेअंतर्गत सर्व अविवाहीत व विवाहीत पुरुष नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार तसेच, त्यांच्या कुटुंबामधील आई, वडील, पत्नी व १० वर्षावरील प्रथम दोन अपत्ये, ही लाभार्थी म्हणून गणण्यात येतील.

**(अ-२)** सदर योजनेअंतर्गत सर्व अविवाहीत महिला नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार तसेच त्यांच्या कुटुंबामधील आई व वडील ही लाभार्थी म्हणून गणण्यात येतील.

**(अ-३)** सदर योजनेअंतर्गत सर्व विवाहीत महिला नोंदित सक्रीय (जिवित) बांधकाम कामगार तसेच त्यांच्या कुटुंबामधील सासु, सासरे, पती व १० वर्षावरील प्रथम दोन अपत्ये ही लाभार्थी म्हणून गणण्यात येतील.

आई-वडीलांचे नाते सिध्द करण्याकरीता कुटुंबाचे रेशनकार्ड , आधारकार्ड, पॅनकार्ड त्यापैकी कोणताही एक पुरावा सादर करणे बंधनकारक राहील असा प्रस्ताव शासनास सादर

करण्यात आला होता. त्यास दि.०१.१०.२०२४ रोजीच्या उद्योग, ऊर्जा कामगार व खनिकर्म विभागाच्या शासन शुध्दीपत्रकान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

**ठराव क्र.६१(४)/२०२४ :-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवित) बांधकाम कामगार व कुटुंबिय यांचेकरीता राबविण्यात येणाऱ्या तपासणी ते उपचार (Test to Treat) आरोग्य योजनेमध्ये बांधकाम कामगाराच्या आई-वडीलांचा समावेश करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याणकारी मंडळ,**
**मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र. ०५:-** **सन २०२०-२१ आणि सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयांमधील मंडळ कामकाजासाठी मे. ब्रिक्स इंडिया प्रा. लि या बाहयस्त्रोत यंत्रणेकडून मंडळाचे पुर्वमंजुरीस अधीन राहुन घेण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचारी सेवा व त्यांना अदा केलेल्या मानधन कार्यवाहीस कार्योत्तर मजुंरी घेणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिवानी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळाकडील अधिकारी / कर्मचारी सुधारीत आकृतीबंधास मंडळाने शासनास सादर केलेल्या प्रस्तावास मंजुरी अप्राप्त असलेने सन २०१२-१३ पासून मंडळाच्या कामकाजासाठी आवश्यकतेनुसार उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने सुचीबध्द केलेल्या संस्थापैकी मे. ब्रिक्स इंडीया प्रा. लि. या संस्थेकडून मंडळाच्या मान्यतेने कंत्राटी कर्मचा-यांच्या सेवा घेण्यात येतात. सन २०२०-२१ आणि सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये मंडळाच्या पुर्व मान्यतेस अधीन राहून घेण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचारी सेवा व त्यांना अदा केलेल्या मानधन कार्यवाहीस कार्योत्तर मजुंरी घेणे आवश्यक आहे.

सन २०२०-२१ आणि २०२१-२२ मध्ये मे. ब्रिक्स इंडीया प्रा. लि. या संस्थेकडून मंडळाच्या क्षेत्रिय कार्यालयांकरीता मंडळ कामकाजासाठी आवश्यकतेनुसार घेण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा-यांच्या सेवा व त्यांना अदा केलेल्या मानधनास मंडळाची मंजुरी नसल्याने मंडळाच्या सन २०१७-१८ ते २०२१-२२ या कालावधीतील निष्पादन लेखापरीक्षण (Performance Audit) मध्ये AM-९६ अन्वये आणि प्रारूप अहवालामध्ये आक्षेप नोंदविण्यात आला आहे. सदर लेखा Exit Conference मध्ये मंडळाच्या वतीन मा. सचिव तथा मु.का.अ. यांनी सदर आक्षेपाच्या अनुषंगाने सदरहू कंत्राटी कर्मचारी सेवा व त्यांना अदा केलेले मानधन यांना मंडळाची कार्योत्तर मंजुरी घेण्यात येईल असे अनुपालन सादर केले आहे.

त्यानुसार खालील तक्त्यात नमुद प्रमाणे सन २०२०-२१ मध्ये ३६ कंत्राटी कर्मचा-यांसाठी प्रदान करण्यात आलेली रक्कम रू. ६७,८६,२३१/- आणि सन २०२१-२२ मध्ये ४४ कंत्राटी कर्मचा-यांसाठी प्रदान करण्यात आलेली रक्कम रू. ९६,८२,२०६/- इतक्या मानधनास व नियुक्त कंत्राटी मनुष्यबळ संख्येस मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यासाठी विचार विनिमयास सविनय सादर.

| FY २०२०-२१ | | | | FY २०२१-२२ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **District** | **Name of Contractual Post** | **No of Posts** | **Amount** | **District** | **Name of Contractual Post** | **No of Posts** | **Amount** |
| Amaravati | Clerk | ३ | ८,१९,१०८ | Ahemednagar | Peon | १ | २,३९,७७५ |
| Beed | Peon | २ | ३६,४०८ | Amaravati | Clerk | ३ | ५,३२,९२० |
| Gondia | Clerk | १ | २,५५,९९६ | | DEO | १ | १,७६,५८७ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | DEO | १ | २,५५,९९६ | Aurangabad | Peon | १ | २,४०,४०६ |
| Jalna | Clerk | १ | २,५५,९९६ | | Jr Accountant | १ | ९१,४७१ |
| Latur | Clerk | २ | ५,११,९९२ | Beed | Peon | १ | २,२१,५७२ |
| | DEO | २ | २,९८,६६२ | Dhule | Peon | १ | १,६४,७४४ |
| | Peon | १ | ५४,६१२ | Gondiya | Clerk | १ | १,५८,३५१ |
| Parbhani | DEO | १ | १,०६,६६५ | | DEO | १ | ८७,५८१ |
| | Peon | १ | ५४,६१२ | Hingoli | Peon | १ | १,२३,९०० |
| Raigad | Peon | १ | ५४,६१२ | Jalna | Clerk | १ | २,७८,०७१ |
| Wardha | Clerk | ३ | ३,१८,५५६ | | Peon | १ | २,०३,३६१ |
| Yavatmal | Clerk | २ | १,४१,३३१ | Kolhapur | Clerk | १ | १,०१,४९४ |
| Nagpur | Clerk | २ | ५,४६,०९६ | | DEO | २ | २,०२,९८८ |
| | DEO | ३ | ७,५०,८८२ | | Peon | १ | ९१,१०८ |
| | Jr Accountant | १ | ३,६५,११६ | | Driver | २ | ७,५०,००८ |
| | Superintendent | १ | ३,८३,०१६ | Latur | Clerk | २ | ५,४४,३५८ |
| Mumbai | Jr Accountant | ३ | ७,०१,३३१ | | DEO | १ | २,७७,६७१ |
| | Peon | ५ | ८,६६,४३६ | | Peon | १ | २,३९,२३५ |
| | | | | Nanded | Peon | १ | १,४४,३२२ |
| | | | | Nandurbar | Peon | १ | १,६४,७४४ |
| | | | | Wardha | Clerk | १ | २,५१,६८० |
| | | | | Yavatmal | Clerk | १ | १,८१,४०५ |
| | | | | Nagpur | Clerk | २ | ५,८१,८९६ |
| | | | | | DEO | २ | ५,८१,८९६ |
| | | | | | Jr Accountant | १ | ३,०४,९३० |
| | | | | | Superintendent | १ | ३,८३,०१६ |
| | | | | Mumbai | Jr Accountant | ३ | ७,४०,००२ |
| | | | | | Peon | ७ | १५,८६,८२६ |
| Total (A) | | ३६ | ६७,८६,२३१ | Total (B) | | ४४ | ९६,८२,२०६ |
| Total (A+B) | | | | | | ८० | १,६४,६८,४३७ |

ठराव क्र.६१(५)/२०२४ :-

१. मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयांमधील मंडळ कामकाजासाठी मे. ब्रिक्स इंडिया प्रा. लि या बाहयस्त्रोत यंत्रणेकडून सन २०२०-२१ मध्ये मंडळाचे पुर्वमंजुरीस अधीन राहुन घेण्यात आलेल्या ३६ कंत्राटी कर्मचारी सेवा व त्यांना अदा केलेल्या मानधन रक्कम रू. ६७,८६,२३१/- यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. तसेच सन २०२१-२२ मध्ये मंडळाचे पुर्वमंजुरीस अधीन राहुन घेण्यात आलेल्या ४४ कंत्राटी कर्मचारी सेवा व त्यांना अदा केलेल्या मानधन रक्कम रू. ९६,८२,२०६ असे एकुण रू. १,६४,६८,४३७/- यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०६:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा प्रचार प्रसिध्दीबाबतचा सन २०२४-२५ चा आराखडा सुधारीत करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटप जलद होण्याच्या हेतुने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता माध्यमनिहाय प्रचार, प्रसिध्दी व जनजागृती आराखडा खालीलप्रमाणे तयार करण्यात आला आहे.

| अ. क्र | मंडळाकडील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांची प्रचार, प्रसिध्दी व जनजागृती माध्यमे | सन २०२४-२५ करीता तरतूद (रू.कोटी) (वस्तू व सेवांकर वगळून) |
|---|---|---|
| १ | News Paper Advertise | २.०० |
| २ | 5 News+ 9 ent.TV Channels (Marathi) as on DAVP List | ३.०० |
| ३ | St stand LED Screen | २०.०० |
| ४ | Navi Mumbai Muncipal Corporation Wrap | १.०० |
| ५ | Pune Corporation Wrap | १.०० |
| ६ | BEST Buses Wrap | ७.०० |
| ७ | MSRTC Bus Panel (3 Side panel) | १०.०० |
| ८ | Chitrarath | ८.०० |
| ९ | Private and DGIPR Hording ( As per availability) | २०.०० |
| १० | Mumbai BQS | १०.०० |
| ११ | Mobile Kiosks | ५.०० |
| १२ | ST Stand Audio jingle at 140 ST depots across the state | ३.०० |
| १३ | Social Media Campaign | ४.५० |
| १४ | Mobile LED Van | १२.०० |

| अ. क्र | मंडळाकडील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांची प्रचार, प्रसिध्दी व जनजागृती माध्यमे | सन २०२४-२५ करीता तरतूद (रू.कोटी) (वस्तू व सेवांकर वगळून) |
|---|---|---|
| १५ | Cable Broadcasting | १०.०० |
| १६ | Mumbai Pol Kiosk | ८.३५ |
| १७ | Central Local Train Audio Jingle | ३.०० |
| १८ | Solapur BQS | ०.१५ |
| १९ | Sambhajinagar BQS | ०.५० |
| २० | Mumbai Local Train LED/LCD | ३.०० |
| २१ | Central Railway Wrap | ३.०० |
| २२ | Bulk SMS | २.५० |
| २३ | Whatsapp/ Chatbox massaging | २.५० |
| २४ | Digital Media | २.५० |
| २५ | Presentation | २.०० |
| २६ | Pune BQS | १.०० |
| २७ | Mumbai Metro Station Line 2 A & 7 | ५.०० |
| २८ | Digital Eco-Friendly Wall Painting | १०.०० |
| | **एकुण** | **१६०.००** |

उपरोक्तप्रमाणे सन २०२४-२५ करीता रक्कम रू. १५०.०० कोटीचा माध्यमनिहाय प्रचार प्रसिध्दीचा आराखडा मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने शासनास दि.०१.०७.२०२४ अन्वये सादर करण्यात आला आहे. तसेच मंडळाच्या दि.०२.०७.२०२४ रोजी संपन्न बैठकीमध्ये त्याबाबतचा ठराव पारीत करण्यात आला आहे.

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या दि.०३.०७.२०२४ अन्वये सन २०२४-२५ करीता उपरोक्त माध्यमनिहाय आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

प्रचार, प्रसिध्दी जनजागृती माध्यम आराखडयास अंतिम स्वरूप देण्याकरीता दि.१०.०७.२०२४ रोजी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई येथे माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने मा. मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष, म. इ. व इ. बां. का. क. मं, मुंबई यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार "**डिजिटल इको-फ्रेंडली वॉल पेंटींग**" या माध्यम घटकासाठी रक्कम रू.१०.०० कोटीची (वस्तू व सेवाकर वगळून) तरतुद करण्याबाबत निर्देश दिले.

त्यानुषंगाने, आर्थिक वर्ष सन २०२४-२५ करीता रक्कम रू. १५०.०० कोटी अधिक "डिजिटल इको-फ्रेंडली वॉल पेंटींग" या माध्यम घटकाकरीता रक्कम रू.१०.०० कोटी असे एकुण १६०.०० कोटीच्या (वस्तू व सेवाकर वगळून) घटकनिहाय प्रचार, प्रसिध्दी व जनजागृती आराखडयास मान्यता प्रदान करण्याबाबत मंडळाच्या दि.१६.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे.

**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या दि.०६.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये रक्कम रू.१५०.०० कोटी रक्कमेच्या जाहिरात माध्यम आराखडयामध्ये अधिकच्या डिजिटल इको-फ्रेंडली वॉल पेंटीग या माध्यमाकरीता रक्कम रू.१०.०० कोटी अशा एकुण रूपये १६०.०० कोटी रक्कमेच्या जाहिरात माध्यम आराखडयास शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे.**

मंडळांतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटप जलद होण्याच्या हेतुने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता अतिरीक्त रक्कम रू.१५.०० कोटीचा माध्यमनिहाय प्रचार प्रसिध्दी व जनजागृती आराखडा तयार करण्यात आला असून त्याबाबतचा प्रस्ताव माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांना सादर करण्यात आलेला आहे.

| अ.क्र | मंडळाकडील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांची प्रचार, प्रसिध्दी व जनजागृती माध्यमे | सन २०२४-२५ करीता तरतूद (रू.कोटी) (वस्तू व सेवांकर वगळून) |
|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ |
| ०१ | Best Pol Kiosk in Mumbai | २,००,००,००० |
| ०२ | St stand LED Screen | ८,००,००,००० |
| ०३ | Best Bus Shelters in Mumbai | ५,००,००,००० |
| | **एकुण** | **१५,००,००,०००** |

तरी, उपरोक्तप्रमाणे सन २०२४-२५ करीता रक्कम रू. १६०.०० कोटी अधिक रक्कम रू.१५.०० कोटी असे एकुण रक्कम रू.१७५.०० कोटीचा माध्यमनिहाय प्रचार,

प्रसिध्दी व जनजागृती आराखडयास मान्यता प्रदान करण्याबाबत मंडळ बैठकीत प्रस्तावित करण्यात आले.

**ठराव क्र.६१(०६)/२०२४ :-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा प्रचार प्रसिध्दीबाबतचा सन २०२४-२५ चा आराखडा सुधारीत करणेबाबत मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०७:-** **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विविध योजनांचा प्रचार अतिरिक्त "सर्वसमावेशक माहिती पुस्तीकांची छपाई करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगार लाभार्थ्याकरीता विविध प्रकारच्या शैक्षणिक सहाय्य योजना, आर्थिक सहाय्य योजना, सामाजिक सुरक्षा व अन्य योजना व आरोग्य विषयक योजना अशा विविध कल्याणकारी योजनांची माहिती जास्तीत जास्त बांधकाम कामगारांपर्यंत पोहचविण्यासाठी मंडळाची "**सर्व समावेशक माहिती पुस्तिका**" तयार करून वितरीत करण्यास शासनाच्या दि.२३.०१.२०२४ व दि.१५.०२.२०२४ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली असून त्यानुसार ३० लक्ष सर्वसमावेशक माहिती पुस्तीका मंडळ मुख्यालय व जिल्हा कार्यालयात वितरीत करण्यात आल्या आहेत.

मंडळामार्फत दि.२१.०९.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या ई-निविदेमधील परिच्छेद क्र. ६.१८ व ८.१ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

- The Successful Agency shall have to furnish a renewed Performance Bank Guarantee for an appropriate extended period in case the Purchaser decides to extend the contract period post the completion of the project duration.
- We hereby undertake to provide additional supplies, if any as and when directed by MBOCWW board as per the above mentioned time schedule at the rates quoted under this eTender.

मंडळामार्फत बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटपाच्या मदतीसाठी तालुका स्तरावर ३५८ कामगार सुविधा केंद्र स्थापन करण्यात आले आहे/येत आहे. सदर तालुका सुविधा केंद्रावर जागरूकता होण्याच्या दृष्टीने खालील तक्त्यात नमुद केल्यानुसार पुढीलप्रमाणे माहिती पुस्तीका छपाई करणे आवश्यक असल्याने ५,१०,५१० "**सर्व समावेशक माहिती पुस्तिका**" मंडळ मख्यालयाकरीता छपाई करण्याबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या दि.१२.०९.२०२४ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता त्यास शासनाच्या दि.१९.०९.२०२४ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

**ठराव क्र.६१(०७)/२०२४ :-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विविध योजनांचा प्रचार अतिरिक्त "सर्वसमावेशक माहिती पुस्तीकांची" छपाई करणेबाबत. मे. NACOF India Ltd. (Consortium member Akruti Print Solutions Pvt. Ltd.) यांचेसोबत अतिरीक्त माहितीपुस्तीकेचा पुरवठा करणेबाबत करारनामा करणे व पुरवठा आदेश देण्याबाबत शासन मान्यतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम<br>कामगार कल्याणकारी मंडळ,<br>मुंबई | अध्यक्ष<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम<br>कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र.०८ :- मंडळाअंतर्गत मुख्यालय व अधिनस्त जिल्हा कार्यालयाच्या अभिलेख कक्षाकरीता अतिरिक्त कॉम्पॅक्टर स्टोरेज उपलब्ध करून देणेबाबत व ३ वर्षाकरीता मान्य दरानुसार कागदपत्रांचे स्कॅनिंग करण्यास मान्यता देणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, राज्यातील कामगार विभागाच्या कार्यालयातील अभिलेख सुस्थितीत स्कॅनिंग करून डिजिटल कॉपेक्टरमध्ये जतन करून ठेवणेबाबत ई- निविदा पध्दतीने कार्यवाही करण्यात आली होती. मंडळ व शासन मान्यतेने नियुक्त संस्थेसोबत केलेला करारनामा करून दिनांक ०४.०७.२०२३ अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. सदर कार्यादेशानुसार पुरवठादार संस्थेने बहुतांश कामकाज (कॉम्पेक्टर स्टोरेज व अभिलेख स्कॅनिंग अ‍ॅण्ड डिजिटायझेशन) समाधानकारकपणे पुर्ण केले असून उर्वरीत कामकाज प्रगतीत आहे. सबब, विभागीय व जिल्हा कार्यालयाच्या मागणीनुसार अतिरीक्त कॉम्पेक्टर स्टोरेज व अभिलेख स्कॅनिंग अ‍ॅण्ड डिजिटायझेशन खरेदी करणे आवश्यक आहे.

विभागीय व जिल्हा कार्यालयाच्या मागणीनुसार अतिरिक्त कॉम्पेक्टर स्टोरेज व अभिलेख स्कॅनिंग अ‍ॅण्ड डिजिटायझेशन खरेदी करीता खरेदी समितीच्या मान्यतेने पुढील कार्यवाही करणेसाठी मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांना प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांनी खरेदी समितीच्या मान्यतेने पुढील कार्यवाही करणेबाबत मान्यता प्रदान केली आहे. सदर मान्येअंती मा. कामगार आयुक्त तथा अध्यक्ष, ई- निविदा खरेदी समिती यांच्या अध्यक्षतेखाली दि.०९.०९.२०२४ रोजी खरेदी समितीची बैठक पार पाडली सदर बैठकीतील चर्चेअंती अतिरिक्त कॉम्पेक्टर स्टोरेज व अभिलेख स्कॅनिंग अ‍ॅण्ड डिजिटायझेशन खरेदीबाबतचा प्रस्ताव शासन निर्णयार्थ सादर करून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरले मंडळ मुख्यालय व अधिनस्त जिल्हा कार्यालयाच्या अभिलेख कक्षाचे कॉम्पेक्टर व स्कॅनिंग अ‍ॅण्ड डिजिटायझेशन खरेदीबाबत मे. सेंट्रल गर्व्हमेंट एम्पलॉईज कन्जुमर को ऑ. सोसायटी (केंद्रीय भांडार) यांच्यासोबत दि.२७.०६.२०२३ रोजी करण्यात आलेल्या करारनाम्यातील तरतुदीनुसार अतिरीक्त कॉम्पेक्टर स्टोरेज व अभिलेख स्कॅनिंग अ‍ॅण्ड डिजिटायझेशन खरेदीकरीता खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

| क्र. | बाब | दर रू. (वस्तू व सेवा करासहीत) | रू.दहा कोटी (रू.१० कोटी) च्या मर्यादेत अतिरिक्त कॉम्पेक्टर स्टोरजची संख्या | अतिरिक्त काम्पेक्टर स्टोरेज व अभिलेख स्कॅनिंग अ‍ॅण्ड डिजिटायझेशन ची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | कॉम्पेक्टर स्टोरेज (प्रति कॉम्पेक्टर) | १५,५०,००० | ५८ (५८X१५,५०,०००) | ८,९९,००,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | अभिलेख स्कॅनिंग अॅण्ड डिजिटायझेशन (प्रति पृष्ठ) | २.९० | २९,००,००० (२९,००,०००X २.९०) | ८४,१०,००० |
| | | | एकूण | ९,८३,१०,००० |

वरीलप्रमाणे सादर प्रस्तावास खरेदी समितीने मान्यता प्रदान केलेनंतर दि.१२.०९.२०२४ रोजी शासनास प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावास शासनाने दि.१९.९.२०२४ अन्वये मान्यता प्रदान केली आहे. सदर मान्यतेअंती नियुक्त संस्थेस दि.३०.०९.२०२४ रोजी कार्यादेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर संस्थेमार्फत पुढील ३ वर्षापर्यंत कॉम्पॅक्टरमध्ये जतन करायच्या कागदपत्राचे स्कॅनिंग मान्य दराने करुन घेण्याबाबतही प्रस्तावित करण्यात येत आहे.

**ठराव क्र.६१(०८)/२०२४ :-**

**मंडळाअंतर्गत मुख्यालय व अधिनस्त जिल्हा कार्यालयाच्या अभिलेख कक्षाकरीता अतिरिक्त कॉम्पॅक्टर स्टोरेज उपलब्ध करून देणेबाबत व ३ वर्षाकरीता मान्य दरानुसार कागदपत्रांचे स्कॅनिग करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याणकारी मंडळ,**
**मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र.०९ :- उपकर परतावा प्रकरणास मंजूरी देणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाच्या दि. १२.१२.२०२२ रोजीच्या मंडळ बैठकीमध्ये ठराव क्र.५९(१९)/२०२२ अन्वये क्षेत्रिय कार्यालयांच्या पडताळणी अहवालानंतर मंडळ स्तरावरुन छाननी करताना संबधित प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांजकडून त्यांचे यापूर्वीचे बांधकाम उपकर दायित्व तपासावे व दायित्वाची रक्कम वसुल करुन उर्वरित परतावा मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने अदा करण्यात यावा असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आलेला आहे. त्यानुसार मे. बी. एन. सी. पॉवर लिमिटेड यांना रक्कम रु. ३,८६,३९,४९२/- उपकर परतावा मंजूर करुन अदा करण्यात आला आहे.

मे. बी. एन. सी. पॉवर लिमिटेड यांनी त्यांचे देयकातून महाराष्ट्र राज्य विद्युत वहन कं. लि., यांनी वसूल केलेल्या आणि मंडळाकडे जमा केलेल्या बांधकाम उपकराचा साहित्य पुरवठा व उभारणी याचा समावेश बांधकामाच्या संज्ञेत मोडत नसल्याचे वसुल केलेला उपकर परत मिळणेबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे याचिका क्र. २४७७/२०२१ दाखल करण्यात आली होती, त्या संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी मा. सर्वोच्च न्यायालयाने मे. जी ई टी ॲण्ड डी इंडिया लि. (सुप्रा) आणि कल्पतरु पॉवर ट्रान्समिशन (सुप्रा) यांच्या संदर्भात याचिका क्र. ३७०५२/२०२३ मध्ये दिलेल्या आदेशाच्या धर्तीवर मे. बी एन सी पॉवर लिमिटेड यांच्या देयकातून महाराष्ट्र राज्य विद्युत वहन कं. लि., यांनी वसूल केलेल्या आणि मंडळाकडे जमा केलेल्या बांधकाम उपकराचा परतावा मे. बी. एन. सी पॉवर लिमिटेड यांना करण्याबाबत दि. १७.०१.२०२४ रोजी आदेश दिल्यानुसार बांधकाम उपकर परतावा करण्यात आला आहे.

| अ.क्र. | आस्थापनाचे नाव | उपकर परतावा मागणी रक्कम (रु) | आरटीजीएस द्वारे परतावा अदा तपशिल |
|---|---|---|---|
| १. | मे. बी. एन. सी. पॉवर लिमिटेड | रु. ३,८६,३९,४९२/- | १. रु. ३,८५,५९,०५३/-<br>RTGS दि.३०.०८.२०२४<br>२. रु. ८०,४३९/-<br>RTGS दि.०४.१०.२०२४ |
| उपकर परतावा करण्यात आलेली रक्कम | | रु. ३,८६,३९,४९२/- | |

**ठराव क्र.६१(०९)/२०२४ :-**

**मे. बी.एन.सी. पॉवर लिमिटेड यांना करण्यात आलेल्या बांधकाम उपकर परतावा रक्कम रू. ३,८६,३९,४९२/- (तीन कोटी शहाऐंशी लाख एकोनचाळीस हजार चारशे ब्याण्णव रूपये मात्र) मंडळाने मंजूर करून प्रदान केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र.१०:-** **बांधकाम कामगारांच्या सुविधेकरीता अतिरिक्त तालुका सुविधा केंद्र स्थापन करण्याबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाच्या दि.०२.०७.२०२४ रोजीच्या ६० व्या बैठकीत दैनंदिन बांधकाम कामगारांची संख्या वाढत असल्यामुळे तालुका स्तरावरील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपास गती देण्याकरीता तालुका स्तरावर सुविधा केंद्र स्थापन करण्यास व ई-निविदा पध्दतीने संस्था निश्चित करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली होती.

तालुका सुविधा केंद्र स्थापनेबाबत ई- निविदेमध्ये अतिरिक्त तालुका सुविधा केंद्राबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

MBOCWW Board intends to setup one Taluka Level Worker Facility Center in each of ३५८ Taluka in Maharashtra State. However, considering the quantum of construction works and registration of workers, MBOCWW board may increase or decrease number of Taluka Level Worker Facility Center by २०%.

ई- निविदेतील वरील अटीच्या अनुषंगाने खालील तालुक्यात सुविधा केंद्र सुरू करणे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | पत्ता |
|---|---|---|---|
| १. | सांगली | सांगली | सांगली |
| २. | सांगली | वाळवा | आष्टा |
| ३. | सांगली | जत | संख |
| ४. | सातारा | कराड | दक्षिण कराड |
| ५. | सोलापूर | दक्षिण सोलापूर | मंडरुप |
| ६. | कोल्हापूर | करवीर | कोल्हापूर |
| ७. | कोल्हापूर | राधानगरी | मुरगूड |
| ८. | सांगली | मिरज | सलगरे |

**ठराव क्र.६१(१०)/२०२४ :-**

**बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाच्या मदतीसाठी अतिरिक्त तालुका स्तरावर कामगार सुविधा केंद्र स्थापन करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याणकारी मंडळ,**
**मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र. ११ महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील सन २०२४-२५ मधील गुंतवणूक उपसमितीने अतिरिक्त निधीच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये केलेल्या गुंतवणुक कार्यवाहीस मंजुरी देणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व वित्त विभाग, शासन निर्णय दि. २७.१०.२०१५ व १३.०३.२०२० मधील मार्गदर्शक सुचनानुसार, मंडळाकडील जमा उपकर निधीपैकी अतिरिक्त निधीची गुंतवणुक राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये गुंतवणूक उपसमितीद्वारे गुंतवणूक करण्याचे निदेश आहेत. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचेकडील पत्र दि. ०५.०७.२०२१ अन्वये गुंतवणुक उपसमितीचे खालीलप्रमाणे पुर्नगठन करण्यात आले आहे.

| अ.क्र. | गुंतवणुक उपसमिती | पद |
|---|---|---|
| १. | मा. मंत्री महोदय, कामगार विभाग तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई | अध्यक्ष |
| २. | मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य |
| ३. | उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ४. | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई | सदस्य |

उपरोक्त नमुदप्रमाणे गुंतवणूक उपसमितीने मंडळाकडील अतिरीक्त निधी राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये गुंतवणूक करण्यासाठी वेळोवेळी बैठकांचे आयोजन करून कामकाज पुर्ण केले आहे. त्यास मंडळाची मान्यता घेण्यात आली आहे. त्यानुसार सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये एप्रिल ते सप्टेंबर या सहा महिन्याच्या कालावधीत मंडळाकडील अतिरीक्त निधी रू ५७०० कोटी राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये गुंतवणूक केलेच्या कार्यवाहीस मंडळाची मान्यता आवश्यक आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेश व वित्त विभाग,शासन निर्णय दि. २७.१०.२०१५ व १३.०३.२०२० मधील मार्गदर्शक सुचनानुसार, मंडळाकडील शासनमान्य गुंतवणूक

उपसमितीने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये एप्रिल ते सप्टेंबर या सहा महिन्याच्या कालावधीत ६ मुदत ठेव पावत्यांच्या एकुण रू. ५७०० कोटी गुंतवणूकींकरीता बैठकांचे आयोजन केले व त्याद्वारे सर्व संबंधित राष्ट्रीयकृत बँकाकडून ऑनलाईन प्रकाराने मायक्रोसॉफ्ट मीट या ॲप्लिकेशनवर रेकॉडेड व्हीडीओ कॉन्फरन्सीगव्दारे एक वर्षाच्या कालावधीसाठी Non Callable प्रकारातील मुदतबंद ठेव पावतीमधील गुंतवणूकीकरीता खुल्या स्पर्धात्मक व्याजदर बोलीने केलेल्या प्रक्रीयेत १२ राष्ट्रीयकृत बँकाकडून प्राप्त दरांपैकी सर्वोच्च व्याजदर बोली लावलेल्या खालील नमुद राष्ट्रीयकृत बँकामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व शासन निर्णय दि. २७.१०.२०१५ व दि. १३.०३.२०२० मधील मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करून गुंतवणूक करण्यात आली आहे.त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

**(रु.कोटीत)**

| अ. क्र. | बँकेचे नाव | शाखेचे नाव | गुंतवणूक दिनांक | परिपक्वता दिनांक | गुंतवणुक रक्कम | व्याजदर द.सा.द.शे | परिपक्वतेनंतर प्राप्त होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कॅनरा बँक | बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई. | १८.०४.२०२४ | १८.०४.२०२५ | १००० | ७.७५% | १०७९.७८ |
| २. | बँक ऑफ बडोदा | बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई. | १३.०५.२०२४ | १३.०५.२०२५ | १०५० | ७.६८ | ११३२.९९ |
| ३. | बँक ऑफ बडोदा | बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई. | १८.०५.२०२४ | १८.०५.२०२५ | १२५० | ७.६८ | १३४८.८० |
| ४. | कॅनरा बँक | बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई. | २७.०५.२०२४ | २७.०५.२०२५ | ११०० | ७.७२ % | ११८७.४१ |
| ५. | स्टेट बँक ऑफ इंडिया | बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई. | १०.०७.२०२४ | १०.०७.२०२५ | ६०० | ७.८२ % | ६४८.३१ |
| ६. | स्टेट बँक ऑफ इंडिया | बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई. | ०६.०९.२०२४ | ०६.०९.२०२५ | ७०० | ७.९०% | ७५६.९५ |
| | एकुण | | | | ५७०० | | ६१५४.२४ |

वरीलप्रमाणे, गुंतवणूक उपसमितीने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या एप्रिल ते सप्टेंबर, २०२४ या सहा महिन्याच्या कालावधीतील मंडळाकडील अतिरिक्त निधी रू ५७०० कोटी राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये एक वर्षाच्या कालावधीसाठी Non Callable प्रकाराने केलेल्या गुंतवणूक कार्यवाहीस मंडळाची मान्यता घेणे प्रस्तावित आहे.

मंडळ मान्यतेनंतर प्रशासकीय विभागास केलेल्या गुंतवणूकीचा अहवाल सादर करणेचे प्रस्तावित कार्यवाहीस मान्यतेस्तव सादर करणे प्रस्तावित आहे.

**ठराव क्र.६१(११)/२०२४ :-**

**मंडळाच्या गुंतवणूक उपसमितीने, सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात माहे एप्रिल ते सप्टेंबर, २०२४ या सहा महिन्याच्या कालावधीतील मंडळाकडील अतिरिक्त निधी रू. ५७०० कोटी राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये एक वर्षाच्या कालावधीसाठी Non Callable प्रकाराने केलेल्या गुंतवणुक कार्यवाहीस मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. १२ महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील सन २०२४-२५ या चालु आर्थिक वर्षातील माहे एप्रिल ते सप्टेंबर - २०२४ अखेर उपकर जमा व योजनानिहाय खर्चास मंजुरी देणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की,इमारत व इतर बांधकाम कामगार यांचे संदर्भात रोजगार व सेवाशर्ती तसेच त्यांची सुरक्षा, आरोग्य,कल्याण विषयक व इतर संबंधित बाबीसाठी तरतूदी करण्याच्या उद्देशाने करण्यात आलेल्या इमारत व इतर बांधकाम (रोजगार व सेवाशर्ती नियमन)अधिनियम,१९९६ या केंद्रीय अधिनियमांतील तरतुदीच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने इमारत व इतर बांधकाम नियम २००७ तयार केलेले आहेत. इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम ,१९९६ च्या कलम ३(१)अनुसार केंद्र शासनाने अधिसूचना क्र.एसओ २८९९, दि.२६ सप्टेंबर १९९६ अन्वये बांधकामाच्या एकूण मुल्याच्या (जमिनीचे मुल्य वगळून) १% दराने उपकर गोळा करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार मंडळाकडील बँक खात्यामध्ये उपकर जमा होत आहे. तसेच नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांसाठी मंडळाअंतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ दिला जातो.

**मसुदा-**

सद्यस्थितीत सन २०२४-२५ मध्ये , महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने माहे एप्रिल ते सप्टेंबर, २०२४ अखेर केलेल्या जमा उपकर व योजनानिहाय खर्चाचा गोषवारा खालीलप्रमाणे

| अ. क्र | महिना | जमा | योजनानिहाय खर्च | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उपकर | गृहपयोगी वस्तू संच | अत्यावश्यक संच | सुरक्षा संच | आरोग्य तपासणी | विविध कल्याणकारी योजना DBT in Cash | तालुका सुविधा केंद्र | WFC | अटल विश्वकर्मा सन्मान योजना - जाहिरात खर्च | अटल बांधकाम कामगार आवास योजना | प्रशासकीय खर्च | एकूण |
| १ | एप्रिल - २०२४ | ३८०.७२ | १०२.५० | ७.५३ | ७.४६ | ०.०० | ०.०० | ०.०० | ६.०४ | २.३२ | ६.८८ | १.८१ | १३४.५४ |
| २ | मे -२०२४ | ३१४.११ | ८५.०८ | ३०.८५ | ३०.५६ | १२३.१३ | ०.०० | ०.०० | २.४४ | ११.५५ | ०.०० | १८.६६ | ३०२.२७ |
| ३ | जुन - २०२४ | २१४.६० | ३५.२० | १.७१ | १.६९ | ७१.२७ | १६०.८१ | ०.०० | २.०३९ | २९.१८ | २.२१ | २०.४८ | ३२४.५९ |
| ४ | जुलै-२०२४ | २५२.९७ | ८५.८५ | ०.०० | ०.०० | ५४.१० | ६१.३१ | ११.१९ | २.८९ | ०.०० | ०.०१ | १६.६८ | २३२.०३ |
| ५ | ऑगस्ट- २०२४ | २६२.५८ | १८५.५० | ०.०० | ०.०० | ७६.१६ | ६२.५४ | २७.७६ | ४.०६ | ०.१९ | ०.०० | ३.०५ | ३५९.२६ |
| ६ | सप्टेंबर- २०२४ | २५६.२२ | ३२४.६५ | ६८.७६ | ६८.१८ | १११.०५ | ५८.६० | १२.७५ | ६.२८ | ०.०० | ०.०० | ३.०० | ६५३.२७ |
| | **एकूण** | **१६८१.२०** | **८१८.७८** | **१०८.८५** | **१०७.८९** | **४३५.७१** | **३४३.२६** | **५१.७०** | **२३.७५** | **४३.२४** | **९.१०** | **६३.६८** | **२००५.९५** |

**ठराव क्र.६१(१२)/२०२४ :-**

**सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील माहे एप्रिल ते सप्टेंबर- २०२४ अखेर, जमा उपकर रू. १६८१.२० कोटी व एकुण खर्च रू. २००५.९५ कोटी (प्रशासकीय खर्च रू ६३.६८ कोटी + योजना खर्च रू. १९४२.२६ कोटी) यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याणकारी मंडळ,**
**मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र.१३:- NSDC इंटरनॅशनल आणि महाराष्ट्र इंटरनॅशनलव्दारे इस्त्राईलमध्ये १०००० बांधकाम कामगारांसाठी बांधकाम क्षेत्रामध्ये रोजगाराच्या उपलब्ध संधी बाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, केंद्र शासनाच्या National Skill Development Corporation (NSDC) मार्फत महाराष्ट्र शासनाकडून इस्त्राईल येथे बांधकाम क्षेत्रामध्ये कौशल्यधारण करणा-या बांधकाम कामगाराचा पुरवठा करण्यासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र इंटरनॅशनल (महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांचा उपक्रम An initiative) यांचेकडील मंडळास प्राप्त ई-मेल दि.२९.१२.२०२३ आणि दि.२१.०३.२०२४ अन्वये राज्यातील बांधकाम कामगारांना NSDC इंटरनॅशनल आणि महाराष्ट्र इंटरनॅशनलव्दारे इस्त्राईलमध्ये १०,००० बांधकाम कामगारांसाठी बांधकाम क्षेत्रामध्ये रोजगाराच्या संधी उपलबध असल्याचा प्रस्ताव मंडळास प्राप्त झालेला आहे.

**मसुदा :-**

उपरोक्तप्रमाणे सादर प्रस्तावात खालील बाबी नमूद आहेत.

१. बांधकाम क्षेत्राशी संबंधित चार प्रकारच्या कामांकरीता रोजगाराच्या संधी –
   - I) Plastering
   - II) Tile laying
   - III) Form work
   - IV) Bar bending

२. १०,००० बांधकाम कामगारांना रोजगाराच्या संधी

३. किमान ३ वर्षाचा अनुभव

४. इयत्ता १० वी पास

५. वय मर्यादा- २५ ते ४५ वर्षे मधील बांधकाम कामगार

६. मासीक वेतन प्रति बांधकाम कामगार १.३७ ते २ लक्ष प्रति महीना

७. याशिवाय अन्य आवश्यक सुविधा.

Maharashtra Institute for Transformation -MITRA यांचेकडील अर्धशासकीय पत्र जा.क्र.५९/२०२४ दि. ०८.२०२४ ची प्रत मंडळ कार्यालयास देण्यात आली आहे. सदर अर्धशासकीय पत्राव्दारे उपरोक्त परिच्छेदात नमूद महाराष्ट्र इंटरनॅशनल (महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांचा उपक्रम An initiative)

यांचेकडून मंडळास प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील नमूद तीन बाबींकरीता मंडळाकडून खर्च करण्याची मागणी करण्यात आलेली आहे.

(१)**कॉल सेंटर खर्च**- बांधकाम क्षेत्रातील पात्रताधारक उमेदवारांपर्यत इस्त्राईल मधील रोजगारांच्या संधींची माहिती पोहोचवण्यासाठी दूरध्वनी करणे तसेच उमेदवारांचे इंग्रजी विषयाचे ज्ञान तपासणे व सदर संधीचा जास्तीत जास्त प्रचार/प्रसिध्दी करण्यासाठी महाराष्ट्र कौशल्य विकास सोसायटीच्या वतीने निवडण्यात आलेल्या Village Social Transformation Foundation या संस्थेसोबत कॉल सेंटर कार्यान्वीत करणेसाठी २ लाख उमेदवारांच्या दूरध्वनी संपर्कासाठी कमाल ४ ते ५ लक्ष खर्च अपेक्षित असून सदर खर्च मंडळाकडुन करणे अपेक्षित आहे.

(२)**उमेदवारांची बांधकाम कौशल्य तपासणी चाचणी खर्च**- इस्त्राईल मध्ये उपलब्ध असलेल्या १०,००० बांधकाम कामगारांच्या संधीकरीता रू.१५००/- प्रति उमेदवार (सिमेंट व इतर आवश्यक चाचणी साहित्य इत्यादीकरीता) प्रमाणे येणा-या उमेदवारांची बांधकाम कौशल्य तपासणी चाचणीचा खर्च मंडळाकडुन करणे अपेक्षित आहे.

(३)तसेच उमेदवारांच्या **आरोग्य तपासणीचा खर्चही** मंडळाकडून करणे अपेक्षित आहे.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त प्रस्तावाची तपासणी केली असता, मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांना इस्त्राईल देशामध्ये बांधकाम क्षेत्रात रोजगाराच्या १०,००० संधी उपलब्ध होणार असल्याने तसेच प्रति बांधकाम कामगार मासीक वेतन रू. १.३७ ते २ लक्ष प्रति महीना मिळणार असल्याने व त्याव्दारे राज्यातील बांधकाम कामगारांचे जीवनमान उंचावण्याची संधी प्राप्त होत असल्याने मंडळाकडून सदर प्रस्ताव स्विकारणे प्रस्तावित असून Maharashtra Institute for Transformation -MITRA यांचेकडील खर्चाच्या प्रस्तावाच्या अनूषंगाने खालील तक्तात नमूद अंदाजित निधी महाराष्ट्र कौशल्य विकास सोसायटी मुंबई यांना मंजूरीबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | खर्च बाब | खर्च परिगणना /मागणी | अंदाजित खर्च रक्कम (रू.) |
|---|---|---|---|
| १. | कॉल सेंटर | ४ ते ५ लक्ष (२ लक्ष उमेदवारांशी दूरध्वनी संपर्काकरीता) | ५,००,००० |
| २. | उमेदवारांची बांधकाम | १०,०००x१,५००=१,५०,००,००० | १,५०,००,००० |

| | | | |
|---|---|---|---|
| | कौशल्य तपासणी चाचणी खर्च | | |
| ३. | आरोग्य तपासणी | - | ० |
| | | **एकूण** | १,५५,००,००० |
| | | | (अक्षरी-एक कोटी पच्चावन्न लक्ष फक्त) |

उपरोक्त तक्यात नमूद अंदाजित खर्च १०,००० उमेदवारांकरीता असून महाराष्ट्र कौशल्य विकास सोसायटीने मंडळाकडून दिल्या जाणा-या सदर निधीचे उपयोजन करून प्रत्यक्ष खर्चानंतर शिल्लक रक्कम मंडळास परत करण्याचे अटीस अधीन राहून निधी वितरण करणे प्रस्तावित आहे.

**ठराव क्र.६१ (१३)/२०२४ :-**

**NSDC इंटरनॅशनल आणि महाराष्ट्र इंटरनॅशनलव्दारे इस्त्राईलमध्ये १०००० बांधकाम कामगारांसाठी बांधकाम क्षेत्रामध्ये रोजगाराच्या उपलब्ध संधी बाबत प्राप्त प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. १४ महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील आर्थिक प्रदानांचे करीता मुदत ठेवीवर ओव्हरड्राफ्ट घेणेच्या कार्यवाहीस मंजुरीबाबत.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील बांधकाम उपकर व अन्य जमा महसूलामधून मंडळाच्या विविध कल्याणकरी योजनांवर खर्च करण्यात येवून उर्वरित अतिरीक्त निधीची राष्ट्रीयकृत बँकांच्या मुदतठेव पावतीमध्ये नॉनकॉलेबल प्रकारात एक वर्षाच्या कालावधीकरीता गुंतवणूक केली जाते. मंडळाने मागील वर्षापासून राबविलेल्या प्रचार प्रसिध्दी अभियानाचे फलस्वरूप मंडळाकडे बांधकाम कामगारांची नोंदणी व नुतनीकरण मोठया प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे मंडळाकडील विविध कल्याणकरी योजना खर्चातही मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. चालु वर्षातील माहे एप्रिल ते ऑगस्ट,२०२४ अखेर मंडळाचा रू.१३५३ कोटी खर्च झाला असून दि. ०६.०९.२०२४ रोजी करण्यात आलेल्या गुंतवणूकी वेळेस दि. ०६.०९.२०२४ ते दि. १२.१०.२०२४ अखेर खर्चाचा अंदाज घेऊन रक्कम रू. ८८९ कोटी शिल्लक ठेवण्यात आली होती. तथापि, दि. ०६.१०.२०२४ अखेर रू. ८१४ कोटी प्रत्यक्ष खर्च झाला असून दि. ०७.११.२०२४ अखेर रू. ३८५ कोटी रक्कमेची देयके प्राप्त झाल्याने व सदर देयकांच्या अदायगीसाठी मंडळाकडे दि. ०७.१०.२०२४ रोजी रू. १३५ कोटी इतकीच रक्कम शिल्लक असल्याने अधिकच्या रू. २५० कोटी रक्कमेच्या देयकांचे प्रदान करण्यासाठी आवश्यक असलेली रू. २५० कोटी रक्कम मा. अध्यक्ष मंडळ यांच्या मान्यतेने बँक ऑफ महाराष्ट्र या राष्ट्रीयकृत बँकांकडील मंडळाच्या मुदत ठेव पावतीवर दि. ०७.१०.२०२४ ते १४.१०.२०२४ या एक आठवडयाच्या कालावधीकरीता द.सा. द .से. ८.२७ % या सर्वात न्यूनतम प्राप्त व्याजदराने ओव्हरड्राफ्ट मंजूर करून घेण्यात आली आहे. सदर ओव्हरड्राफ्ट रक्कमेपैकी मंडळाच्या आवश्यकतेनुसार दि. ०८.१०.२०२४ रोजी रू. १०० कोटी रकमेची उचल करून त्यातून प्राप्त देयकांपैकी काही देयकांची अदायगी करण्यात आली आहे व उर्वरीत मंजुर ओव्हरड्राफ्ट रक्कम मंडळाच्या आवश्यकतेनुसार वेळोवेळी उचल करणे व मंडळाची आगामी मुदत ठेव गुंतवणुक रू. १००० कोटीची परीपक्वता रक्कम सोमवार, दि. १४.१०.२०२४ रोजी प्राप्त होताच त्यामधून प्राध्यान्याने अधिकर्ष / ओव्हरड्राफ्ट परतफेड करणेचे कार्यवाहीस मंडळ मान्यतेची आवश्यकता आहे.

सन २०२४-२५ मध्ये मंडळाच्या विविध कल्याणकारी योजना व प्रशासकीय बाबींवर माहे एप्रिल ते ऑगस्ट ,२०२४ अखेर रू. १३५३ कोटी खर्च झाला आहे. दि. ०६.०९.२०२४ रोजी मंडळाकडील अतिरीक्त निधीची गुंतवणूक करताना आगामी गुंतवणूक परीपक्वता दि. १२.१०.२०२४ अखेर माहे संप्टेंबर करीता रू. ६२० कोटी आणि दि. १ ते १२.१०.२०२४ अखेर रू. २६९ कोटी असा एकूण रू. ८८९ कोटी संभाव्य खर्चाचा अंदाज करून रक्कम

मंडळाच्या विविध कल्याणकारी योजना व प्रशासकीय बाबींवरील खर्चाकरीता शिल्लक ठेवली होती. तथापि, माहे सप्टेंबर मध्ये रू. ६५३ कोटी इतका आणि दि. ०१ ते ०६.१०.२०२४ अखेर रू. १६१ कोटी असा एकूण रू ८१४ कोटी इतका प्रत्यक्ष खर्च झाला आहे. दि. ०७.१०.२०२४ अखेर खालील तक्त्यात नमुदप्रमाणे रू. ३८५ कोटी रक्कमेची देयके प्राप्त झाली आहेत.

| अ.क्र. | अदायगीस प्राप्त / संभाव्य प्राप्त देयके | पुर्णांकात अंदाजित रक्कम रू. कोटीत |
|---|---|---|
| १. | गृहपयोगी वस्तू संच देयके - प्रत्यक्ष प्राप्त | ६०/- |
| २. | सुरक्षा संच व अत्यावश्यक संच- प्रत्यक्ष प्राप्त | ४०/- |
| ३. | आरोग्य तपासणी देयके- प्रत्यक्ष प्राप्त | १३६/- |
| ४. | प्रचार प्रसिध्दी देयके-<br>प्रत्यक्ष प्राप्त रू ९० कोटी + संभाव्य रू ३५ कोटी | १२५/- |
| ५ | विविध कल्याणकारी योजना डीबीटी - प्रत्यक्ष प्राप्त | २४/- |
| | **एकूण** | **३८५/-** |

तथापि उपरोक्त तक्त्यात नमुद रू. ३८५ कोटी देयकांपैकी प्रत्यक्ष प्राप्त रू. ३५० कोटी देयकांची अदायगी करण्यासाठी सद्यस्थितीत मंडळाच्या सर्व प्रकारच्या बँक खात्यांवर दि. ०७.१०.२०२४ अखेर रू. १३५ कोटी एवढीच रक्कम शिल्लक आहे. मंडळाची आगामी मुदत ठेव गुंतवणुक रू. १००० कोटी दि. १२.१०.२०२४ रोजी परीपक्व होत असून सदर गुंतवणूक नॉनकॉलेबल प्रकारातील असल्याने परीपक्वता दिनांकापूर्वी त्याचे रोखीकरण करता येत नाही. दि. १२.१०.२०२४ रोजी दुसरा शनिवार आणि दि. १३.१०.२०२४ रोजी रविवार या बँकेस सार्वजनिक सुट्टयांमुळे सोमवार, दि. १४.१०.२०२४ रोजी परीपक्वता रक्कम प्राप्त होणार आहे. सबब, उर्वरीत रू. २५० कोटी देयकांची विहीत मुदतीत अदायगी करण्यासाठी मंडळाची मुदत ठेव असलेल्या ठेवीदार बँकेकडून मुदत ठेवीच्या रक्कमेवर अधिकर्ष / ओव्हरड्राफ्ट काढणे आवश्यक असल्याने रू. २५० कोटी अधिकर्ष / ओव्हरड्राफ्टकरीता मा. मंत्री महोदय कामगार विभाग तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांनी मान्यता प्रदान केलेली आहे.

उपरोक्त मान्यतेनुसार मंडळाच्या मुदतठेव गुंतवणूका असलेल्या राष्ट्रीयकृत बँकाना रू. २५० कोटी रक्कमेसाठी एक आठवडयाच्या कालावधीसाठी अधिकर्ष / ओव्हरड्राफ्टचे स्पर्धात्मक व्याजदर सादर करणेबाबत मंडळ पत्र दि. ०७.१०.२०२४ अन्वये कळविण्यात

आले होते. त्यास अनुसरून विहीत मुदतीत खालील तक्त्यात नमुद राष्ट्रीयकृत बँकेकडून प्राप्त झालेल्या व्याजदराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | बँकेचे नाव | गुंतवणुक रक्कम (रू.कोटीत) | मंडळाचे FDR वरील मंजूर व्याजदर द.सा.द.शे | ओव्हरड्राफ्ट व्याजदर | ओव्हरड्राफ्टकरीता एकुण व्याजदर |
|---|---|---|---|---|---|
| १. | स्टेट बँक ऑफ इंडिया | १००० | ७.७६% | १% | ८.७६% |
| २. | **बँक ऑफ महाराष्ट्र** | **४००** | **७.७७%** | **०.५०%** | **८.२७%** |

उपरोक्त बॅकांच्या प्राप्त व्याजदरांची तुलना करून **बँक ऑफ महाराष्ट्र** या बॅकेंचा ओव्हरड्राफ्ट व्याजदर सर्वात न्यूनतम म्हणजेच मुदत गुंतवणूक ठेवीवरील व्याजदर ७.७७% + ०.५०% असे एकूण **८.२७%** असल्याने मंडळास आवश्यक रू. २५० कोटी अधिकर्ष / ओव्हरड्राफ्ट बँक ऑफ महाराष्ट्र यांचेकडून दि. ०७.१०.२०२४ ते १४.१०.२०२४ या एक आठवडयाच्या कालावधीकरीता मंजूर करून घेण्यात आली आहे. सदर मंजूर ओव्हरड्राफ्ट रक्कमेपैकी मंडळाच्या आवश्यकतेनुसार दि. ०८.१०.२०२४ रोजी रू. १०० कोटी रकमेची उचल करून त्यातून प्राप्त देयकांपैकी काही देयकांची अदायगी करण्यात आली आहे व उर्वरीत मंजुर ओव्हरड्राफ्ट रक्कम मंडळाच्या आवश्यकतेनुसार वेळोवेळी उचल करणेस व त्यामधून उपरोक्त तक्त्यात नमुद प्राप्त देयके अदा करण्यास मान्यतेस्तव तसेच मंडळाची आगामी मुदत ठेव गुंतवणुक रू. १००० कोटीची परीपक्वता रक्कम सोमवार, दि. १४.१०.२०२४ रोजी प्राप्त होताच त्यामधून प्राध्यान्याने अधिकर्ष / ओव्हरड्राफ्ट परतफेड करणेस मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्र.६१ (१४)/२०२४ :-**

**मंडळाकडील दि.०७.१०.२०२४ ते दि.१२.१०.२०२४ अखेर प्राप्त विविध कल्याणकारी योजनांच्या देयकांची विहित मुदतीत अदायगी करण्यासाठी दि.०७.१०.२०२४ ते दि.१४.१०.२०२४ या एक आठवडयाच्या कालावधीकरीता बँक ऑफ महाराष्ट्र या राष्ट्रीयकृत बँकेकडून द.सा.द.से. ८.२७% या सर्वात न्यूनतम प्राप्त व्याजदराने मंजूर करून घेण्यात आलेल्या रू.२५० कोटी**

अधिकर्ष/ओव्हरड्राफट कार्यवाहीस व त्यामधून मंडळाच्या आवश्यकतेनुसार उचल करण्यास व प्रत्यक्ष उचल करण्यात आलेल्या अधिकर्ष/ओव्हरड्राफटची मंडळाची आगामी मुदत ठवे गुंतवणुक रू.१००० कोटीची परीपक्वता रक्कम दि.१४.१०.२०२४ रोजी प्राप्त होताच त्यामधून प्राधान्याने परतफेड करण्याच्या कार्यवाहीस मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. १५ मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयामध्ये कार्यरत बाह्यस्त्रोत यंत्रणेव्दारे कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन शासन मान्यतेच्या अधिन राहून माहे मार्च, २०२५ पर्यंत अदा करण्यास मंडळाची मान्यता प्रदान करण्याबाबत.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, कामगार विभागाने निविदा समितीमार्फत राबविलेल्या निविदा प्रक्रियेनुसार बाह्ययंत्रणेकडून कामे करुन घेण्यासाठी सेवापुरवठादार संस्थेचे / एजन्सीचे पॅनल नियुक्ती करण्यासाठी शासनाने दि.१४.०३.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार ९ एजन्सींना अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता दिलेली होती.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.०५.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कामगार विभागाच्या अधिनस्त असलेल्या विविध कार्यालयासाठी बाहय यंत्रणेव्दारे मनुष्यबळ घेण्यासाठी मे. एस-२ इन्फोटेक इंटरनॅशनल लि. या संस्थेच्या नियुक्तीस दि.१४.०३.२०२३ व दि.०९.०५.२०२३ येथील शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटीच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार संबंधीत संस्थेसोबत करारनामा करुन पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.

उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि. ३१.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये बाहय यंत्रणेकडून कामे करून घेण्यासाठी सेवापुरवठादार संस्थेस/एजन्सीचे पॅनल नियुक्ती करणेबाबतचा दि.०६.०९.२०२३ शासन निर्णय रद्द करण्यात आलेला आहे. तथापि, शासन निर्णय मधील मुद्दा क्र.०३ मध्ये "ज्या शासकीय विभागीय/ कार्यालयांनी या विभागाच्या दि.०६.०९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयाच्या आधारे मुनष्यबळाच्या सेवा घेतल्या असतील त्या विभागांनी/कार्यालयांनी दि.२१.१०.२०२३ पासून ९ महिन्याच्या आत मनुष्यबळाच्या सेवा प्रशासकीय कामकाज परिणाम होणार नाही, अशा रितीने संपुष्टात आणाव्यात असे नमुद आहे."

सबब, वरील तरतुदीनुसार दि.२१.०७.२०२४ रोजी उक्त नमुद ९ महिन्याचा कालावधी संपुष्टात आला आहे. मंडळ मुख्यालय व क्षेत्रीय पातळीवरील मंडळ कामकाजाचे स्वरुप व व्याप्ती, मनुष्यबळाची आवश्यक्ता पाहता नवीन संस्था निश्चित होईपर्यंत सद्यस्थितीतील संस्थेस पुढील ३ महिन्याकरीता मुदतवाढ देण्याबाबत मा. मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ

यांच्या मान्यतेने दि.१८.०७.२०२४ व दि.०४.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

तथापि, मंडळ मुख्यालय व क्षेत्रीय कार्यालयातील कामकाजाचा आवाका पाहता मंडळ मुख्यालय व क्षेत्रीय कार्यालयामध्ये बाहयस्त्रोत यंत्रणेव्दारे कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या माहे, मार्च २०२५ पर्यंतच्या नियुक्तीस व शासन मान्यतेच्या अधिन राहून त्यांचे वेतन माहे मार्च, २०२५ पर्यंत अदा करण्यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**ठराव क्र.६१ (१५)/२०२४ :-**

**मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयामध्ये कार्यरत बाह्यस्त्रोत यंत्रणेव्दारे नियुक्त कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन शासन मान्यतेच्या अधिन राहून माहे मार्च, २०२५ पर्यंत अदा करणयास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याणकारी मंडळ,**
**मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**